P.V.G.'s

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Annual Exam (2024-25)

## Standard - VIII

**Subject - MARATHI** | **Marks - 50**
**Date - 02/04/2025** | **Time : 8 am to 10 am**

### विभाग १ - गद्य (एकूण गुण - १२)

**प्रश्न १ (अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

एक कुत्रा चिडून माझ्या अंगावर झेप घेऊ बघतो. मी दचकून मागं सरकते. भरत त्याच्यावर खेकसतो, ''झेन्या, चूप! असं नाही करायचं. आपल्या पाहुण्या आहेत त्या. चूप!''

झेन्या जणू समजल्यासारखा चूप बसतो.

दुसरा एक कुत्रा सारखा झेप घेऊ लागतो; पण तो अंगावर तुटून पडण्यासाठी नव्हे. तो पुढचे दोन्ही पंजे जुळवून मला नमस्कार करतो. झेन्या रागीट, तर हा एकदम सालस. भरत मला म्हणतो, ''आल्या-गेल्या सर्व लोकांना तो असा नमस्कार करतो बाई.''

मी भरतला विचारते, ''इथं आणखी कोणते प्राणी येतात रे?'' ''पुष्कळ येतात बाई'', भरत सांगू लागतो, ''शेळ्या येतात. मेंढ्या, ससे येतात. माकडं येतात.''

आम्ही बोलतो आहोत, एवढ्यात माझ्या पायांजवळून एक मांजरी चाललेली दिसते. भरत मला म्हणतो, ''हात लावा बाई तिला.''

मी तिच्या पाठीवर हात ठेवते. मांजरीचं सर्वांग शहारतं. मग ती सावरते. माझ्याजवळ येते. मी तिला थोपटते, तशी ती प्रेमानं 'गुर्रगुर्र' करू लागते. मी भरतला विचारते, ''ही अशी दचकली कशी रे?''

भरत सांगतो, ''जन्मापासून आंधळी आहे ती! तुमचा अनोळखी हात म्हणून घाबरली. इथंच जन्मलेलं हे पोर. जन्मापासून ठार आंधळं. डोळे बघाल तर अगदी लख्ख आहेत; पण दिसत मात्र नाही हं. आम्ही हे पिलू पाळलं. आता मोठी मांजरी झाली आहे. इथं ती सगळ्यांना ओळखते. विश्वासानं वावरते. आम्ही तिला बाहेर सोडत नाही. तिथं बिचारीचा कुठं निभाव लागेल?''

हे सारं पाहून मी बाहेर आले. का कुणास ठाऊक, आत शिरताना जे वाक्य वाचलं, ते पुन्हा डोळ्यांपुढे येत होतं- ''आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हाला आम्ही हवे आहोत का?''

**१) आकृतिबंध पूर्ण करा (आकृती काढणे आवश्यक) (२)**

**जनावरांच्या इस्पितळात कुत्रा व मांजर सोडून येणाऱ्या उताऱ्यातील इतर प्राण्यांची नावे**

२) **झेन्याचा स्वभाव** → [ ] | **पुढचे दोन्ही पंजे जुळवून नमस्कार करणाऱ्या प्राण्याचा स्वभाव** → [ ] (१)

३) **पुढील वाक्ये कोणत्या प्राण्यांसदर्भात आहे त्या प्राण्याचे नाव लिहा** (१)

अ. ''जन्मापासून आंधळी आहे ती!''

→ [ ]

आ. चिडून लेखिकेच्या अंगावर झेप घेऊ बघणाऱ्या प्राण्याचे नाव

→ [ ]

४) **खालील वाक्य कोण, कोणास म्हणाले ते लिहा.** (२)

क. इथंच जन्मलेलं हे पोर –

→ [ ]

ख) 'आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हांला आम्ही हवे आहोत का?'

→ [ ]

**प्र. १ (ब) पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

मी शिकायला सांगलीला होतो. सांगली हे महाराष्ट्रातले एक गाव आहे. आमच्या शाळेला खूप मोठे मैदान होते आणि त्याजवळच एक बाग होती. आम्ही तिथे मनसोक्त खेळायचो, हुंदडायचो, झाडांवर चढायचो, पाऊस आला की त्यात चिंब भिजायचो. निदान सुट्टीमध्ये तरी तुम्ही तुमच्या मोठ्या शहरांमधून बाहेर पडून थंड हवेच्या गिरिस्थानांवर किंवा छोट्या गावी गेले पाहिजे. पक्ष्यांचे चिवचिवणे, थवे न्याहाळणे तसेच जंगलातील विविध पशूंचे आवाज ऐकणे हा मोठा मजेशीर अनुभव असतो. मोकळे आकाश, वाहती नदी आणि झाडे आपल्यासाठी गमतीचा नजराणाच आणत असतात, त्याची मजा तुम्ही लुटली पाहिजे.

माझ्यापुरते बोलायचे, तर मी अभ्यासामध्ये काही फारसा चांगला नव्हतो. मला खेळायला मात्र आवडायचे आणि बॅडमिंटनची आवड मला लहान वयातच लागली होती. निरनिराळे चषक व ढाली घेतलेले माझे कितीतरी फोटो तुम्ही पाहिले आहेत ना? सातत्याने परिश्रम करूनच मी विजेता खेळाडू होऊ शकलो. आंतरराष्ट्रीय सामन्यात आपल्या देशाचे मी प्रतिनिधित्व केले, मला अर्जुन पुरस्कार मिळाला.

**१) आकृतिबंध पूर्ण करा** (२)

**लेखकाने शाळेच्या बागेत मनसोक्त केलेली मजा**

↓ [ ] ↓ [ ] ↓ [ ] ↓ [ ]

**२) लेखकाचे सुट्टीतील मजेशीर अनुभव** **(१)**

| लेखकाचे सुट्टीतील मजेशीर अनुभव | |
|---|---|
| | |

**३)** **(१)**

| गमतीचा नजराणा आणणारे नैसर्गिक घटक | |
|---|---|
| | |

**४) एका शब्दात उत्तर लिहा.** **(२)**

१. लेखक शिकले ते गाव – ______

२. लेखकाला मिळालेला पुरस्कार – ______

३. लेखकास मिळालेली बक्षिसे – ______

## विभाग २ - पद्य (गुण - ७)

या सृष्टीचे मंजुळ गाणे
जगणे मजला शिकवून गेले,
झिलमिलणारे चंद्र चांदणे
जगणे मजला शिकवून गेले!

भरकटलेल्या जगात नाही
संस्कारांची जाण कुणाला,
तुळशीवरल्या त्या पणतीचे
जळणे मजला शिकवून गेले!

प्रेम काय ते कुणा न ठावे
नदी सागरा जीव का लावे?
स्वैर होऊनी नदीचे पळणे
जगणे मजला शिकवून गेले!

बुलंद तरीही असे हौसले
पिल्लासाठी किती सोसले,
चिवचिवणाऱ्या चोचीमधले
दाणे मजला शिकवून गेले!

सागराची अथांगता अन्
ही वृक्षाची स्थितप्रज्ञता,
दुसऱ्यासाठी घाव सोसणे
जगणे मजला शिकवून गेले!

**(१) आकृत्या पूर्ण करा.** **(१)**

**अ)** **कवीच्या अनुभवातले जग**

**ब)** **कवीला जगणे शिकवणारे कवितेतील घटक** **(२)**

**क)** १) सागराचा गुण –  **(१)**

१) वृक्षाचा गुण –

**२) अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करून लिहा.** **(२)**

१) मनुष्याने जन्माला येऊन ______________ साधावा. (स्वार्थ / परमार्थ)

२) संतांच्या भेटीने दिवस ______________ झाला. (सोन्याचा / चंदनाचा)

३) संत चरण दृष्टीला पडल्यावर __________ नाहीसा होतो. (ताप / शीण)

४) संतांच्या सान्निध्यात __________ मिळतो. (आनंद / विरह)

**ब) योग्य जोड्या लावा.** **(१)**

| **अ** | | **ब** | |
|---|---|---|---|
| **अभंगाच्या ओळी** | | **संत कवींचे नाव** | |
| १) | आजि सोनियाचा दिवस | क. | संत चोखामेळा |
| २) | चंदनाच्या संगे बोरीया बाभळी | ख. | संत तुकाराम |
| | | ग. | संत सेना महाराज |

## विभाग ३ - स्थूलवाचन (एकूण गुण - ४)

**प्र. ३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(४)**

१. **शब्दकोशासंबंधी खालील मुद्द्यांना धरून परिच्छेद तयार करा.**

| १) शब्दकोशाचा उपयोग | २) शब्दकोश पाहण्याची उद्दिष्टे |
|---|---|

**किंवा**

तुम्हाला पाठातील एखाद्या शब्दाचा अर्थ शोधायचा असेल तर यापुढे तुम्ही तो कसा शोधाल? ते सोदाहरण सांगा.

## विभाग ४ - व्याकरण (एकूण गुण - १०)

**प्र. ४ (अ) खालील वाक्यांतील <u>अधोरेखित शब्दांची जात ओळखून लिहा</u>.** **(२)**

१. गंगोत्री<u>वर</u>, <u>हाहाकार</u> झाला.

वर- [ ] हाहाकार- [ ]

२. गिर्यारोहणातील बऱ्याच बारीकसारीक <u>गोष्टी</u> समजल्या <u>होत्या</u>.

गोष्टी- [ ] होत्या- [ ]


**(आ) खालील <u>वाक्यांचा प्रकार ओळखा</u>.** **(१)**

**पर्याय: (केवल वाक्य, संयुक्त वाक्य, मिश्र वाक्य)**

१) जर अभ्यास केला तर चांगले गुण मिळतात. [ ]

२) तू मैदानावर किंवा क्लबमध्ये खेळावे. [ ]

**(इ) 'परा' हा उपसर्ग लावून शब्द तयार करा.** **(१)**



**(ई) <u>विरामचिन्हे व त्यांची नावे</u> यांच्या जोड्या जुळवा.** **(१)**

| | विरामचिन्ह | विरामचिन्हाचे नाव |
|---|---|---|
| १) | ! | अ) एकेरी अवतरण चिन्ह |
| २) | '———' | ब) अपूर्ण विराम |
| | | क) उद्‌गारवाचक चिन्ह |

**(उ) खालील शब्दांचे <u>समानार्थी शब्द</u> लिहा. (कोणतेही दोन)** **(१)**

१) राई – ☐ ३) भूमी – ☐

२) करूणा – ☐ ४) मंजुळ – ☐

**(ऊ) खालील शब्दांचे <u>लिंग बदला</u> (कोणतेही दोन)** **(१)**

१) मित्र– ☐ ३) वानरीण – ☐

२) बोका– ☐ ४) घोडी– ☐

**(ए) खालील शब्दांचे <u>जोडशब्द</u> लिहा. (कोणतेही दोन)** **(१)**

१) औषध– ☐ ३) चढ– ☐

२) अंथरूण– ☐ ४) खाणं– ☐

**(ऐ) कंसातील शब्दसमूहांचा वाक्यातील रिकाम्या जागी वापर करून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

पर्याय : **(लक्ष वेधून घेणे, आवाहन करणे, निभाव लागणे)**

१) सुधाकरचा कबड्डीच्या सामन्यात आपल्या मित्रासमोर काहीच-----------

२) चिमुकली मिताली आपल्या आवाजाने सगळ्यांचे------------

३) पोलिसांनी गावकऱ्यांना मदतीसाठी--------------


**विभाग ५ - उपयोजित लेखन (एकूण गुण - १७)**

**प्र. ५ अ) पुढील जाहिरात वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(४)**


# सुवर्णसंधी! सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!

## मित्रांनो, लगेच खरेदी करा...

**मनगटावरील, भिंतीवरील व देवघरातील विशेष प्रकारांची घड्याळे**



*** घड्याळांची वैशिष्ट्ये ***



*** आकर्षक**

*** मजबूत**

*** टिकाऊ**

*** वाजवी किंमत**





**सुमधुर संगीत ऐकवणारे**

* तुम्हालाच कामाची आठवण करून वेळेचे भान आठवणीने सांगणारी घड्याळे

**उत्पादक : 'समय' वॉच कंपनी**

अप्पा बळवंत चौक, पुणे

**प्रश्न**

१) घड्याळांचे प्रकार - [ ] [ ]

२) घड्याळांची दोन वैशिष्ट्ये - [ ] [ ]

३) घड्याळे आपल्याला आठवण करून देतात- [ ] [ ]

४) घड्याळ उत्पादक कंपनीचे नाव - [ ] [ ]

**किंवा**

**सूचनाफलक तयार करा.**

**तुमच्या शाळेत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठीचा सूचनाफलक तयार करा.**

**(ब) पत्रलेखन**

**खालील पत्राच्या नमुन्यात रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्यायी शब्द निवडून पत्र पुन्हा लिहा. (४)**

पर्याय - मुलभूत, हाल, सार्वजनिक, तक्रारीची, विनंती, कार्यवाही, रहिवासी, अधिकारी)

माननीय ________________ ,

पुणे महानगरपालिका,

पुणे.

**विषय: ____________________नळ बंद असल्याची तक्रार.**

माननीय महोदय,

मी पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील धनकवडी विभागात राहणारा ___________ आहे. आमच्या वसाहतीत असलेला सार्वजनिक नळ काही दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे येथील रहिवाशांचे फार________ होत आहेत. आम्हांला पाणी आणण्यासाठी खूप दूर जावे लागते. पाणी ही माणसांची _______________ गरज असल्यामुळे त्याच्याशिवाय जगणे अशक्य आहे. तेव्हा महानगरपालिकेने या ___________दखल घेऊन आवश्यक ती ___________ लवकरात लवकर करावी व पाणीपुरवठा सुरू करावा ही _______ .

तसदीबद्दल क्षमस्व.

राम दाते, ईश्वरनगर,

धनकवडी विभाग, पुणे.

**(२) खालील कथा, रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्यायी शब्द निवडून लिहा. (पूर्ण कथा लिहा). (४)**

**पर्याय: (आळशी, हजर, वाहतूक, सांभाळले, हळहळले, राजा, राग, थैली)**

एका राज्यात धनवंत नावाचा_______ राहत होता. त्याने आपल्या प्रजेला अगदी लेकरासारखे _______होते. एकदा तो वेषांतर करून प्रजेत फिरत होता. प्रजेची सुख दुःखे जाणून घेत होता, अडीअडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न करत होता.

हल्ली त्याला जाणवू लागले की त्याची प्रजा__________ होऊ लागली होती. त्यांना शहाणे करावे असे राजाने ठरवले. त्याने वाहतुकीच्या राजमार्गावर एक मोठा दगड रस्त्याच्या मधोमध ठेवला. दुसऱ्या दिवशी_______ सुरू झाली. सर्वांना तो दगड अडचणींचा वाटला; पण कोणीही तो दगड बाजूला हलवण्याचा विचार केला नाही. कोण कष्ट घेईल? असा विचार प्रत्येक जण करत होता.

तीन-चार दिवस तो दगड तेथेच होता. शेवटी राजा स्वत: तेथे जातीने_______ झाला. तो दगड उचलून दूर केला. त्याखाली एक _______ होती. राजाला तेथे पाहताच लोक तेथे जमले. ती थैली पाहिली. त्यात सर्व चकाकणारे हिरे बघून लोक ___________ . त्यांना आपल्या आळशीपणाचा _____ आला. लोकांना समजले आळस झटकून काम करायला हवे. राज्याची प्रगती होऊ लागली. राजा खूष झाला.

**किंवा**

*** संवादलेखन करा: विषय - नदी व झाड यांच्यातील संवाद लिहा.**

**(ड) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (५)**

१) मला देव भेटला तर... २) माझा आवडता खेळ. ३) निसर्ग आपला गुरू.

■■■